ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53.
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

“अर्थ एव प्रधानः” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १७ | पुणें, बुधवार तारीख २६ सप्टेंबर, १९५१ | अंक ३९

## विविध माहिती

**सीलोनमध्यें कोकोची लागवड**—सीलोनमधील हवामान आणि जमीन कोकोच्या झाडांच्या लागवडीला अतिशय अनुकूल असल्यामुळें त्याचें उत्पादन खूप वाढवितां येण्यासारखें आहे. त्यासाठीं कमी पीक देणाऱ्या झाडाऐवजीं भरपूर पीक देणारीं नवीं झाडें लावणें, रबराच्या मळ्यांतून कोकोचीं झाडें लावणें आणि योग्य खत घालणें, इत्यादि गोष्टींची जरूर आहे, असें एका तज्ज्ञाचें मत आहे.

**ब्रिटनचें भव्य प्रदर्शन ३० तारखेला संपणार**—ब्रिटनमध्यें भरलेलें भव्य प्रदर्शन ३० सप्टेंबर रोजीं संपणार आहे. त्याप्रसंगीं ब्रिटनचे राजेसाहेब फक्त पांच मिनिटेंच रेडिओवर भाषण करणार आहेत. हें प्रदर्शन सुमारें १,६०,००,००० लोकांनीं पाहिलें असावें असा अंदाज करण्यांत आला आहे. दररोज प्रदर्शनाला वाढती गर्दी होत गेली. प्रदर्शन पहाणाऱ्या प्रेक्षकांची दैनिक सरासरी ३६,००० इतकी होती.

**भारताला लोकर किती लागते**—भारताला लागणारें लोकरीचें कापड तयार करण्यासाठीं ७·७ कोटी पौंड लोकर लागते. सर्व ठिकाणाहून होणारा लोकरीचा पुरवठा जमेस धरला तरी तो सालीना ६·२ कोटी पौंडावर जात नाहीं. ह्या लोकरींत ३·२ कोटी पौंड बाहेरची आयात आणि २ कोटी पौंड निर्यात करून देशांत राहिलेली असते.

**पोस्ट—कार्डें देणारीं स्वयंचलित यंत्रें**—भारतामधील कांहीं प्रमुख शहरांच्या पोस्टऑफिसांतून नाणें टाकलें असतां कार्डें देणारीं स्वयंचलित यंत्रें बसविण्यांत येणार आहेत असें समजतें. सध्यां ह्या यंत्राची मुंबईच्या पोस्टाच्या कचेरींत चांचणी करण्यांत येत आहे. युरोपांत अशा प्रकारचीं यंत्रें बऱ्याच शहरांतून वापरण्यांत येतात.

**मद्रास राज्यांतील धरण**—मद्रास राज्यांतील भवानी धरणाचें दोन तृतिआंश काम पुरें झालें आहे. ह्या धरणाची लांबी सुमारें ५॥ मैल होईल. धरणाला ९ कोटी रुपये खर्च येणार असून तें १९५२ अखेर पुरें होईल. तें पूर्ण झाल्यावर कोइमतूर जिल्ह्यांतील २ लाख एकर जमीन कालव्याच्या पाण्याखालीं येईल.

**बँकेचें कर्ज देण्याचे अधिकार**—अमेरिकेच्या इंपोर्ट—एक्स्पोर्ट बँकेच्या कर्ज देण्याच्या अधिकारांत वाढ करण्यांत आली आहे. पूर्वीं बँकेला जितकें कर्ज देण्याचा अधिकार असे त्यापेक्षां १०० कोटी डॉलर्स रकमेपर्यंत अधिक कर्ज आतां बँकेला देतां येईल. अमेरिकन प्रतिनिधीगृहाच्या बँकिंग कमिटीनें हा निर्णय घेतला आहे.

**अमेरिकेच्या घटनेचें जतन**—अमेरिकेच्या राज्यघटनेची मूळ प्रत आतां १६४ वर्षांची पुराणी झाली आहे. त्याचप्रमाणें मानवी हक्कांची सनदहि आतां १७५ वर्षांची झाली आहे. ह्या ऐतिहासिक महत्त्वाच्या कागदपत्रांचें जतन करण्यासाठीं हेलिअम गॅसनें भरलेल्या पात्रांची योजना करण्यांत आली आहे. हवेंतील द्रव, कीटक, इत्यादींच्या हल्ल्यानें आधींच जीर्ण झालेलीं वरील कागदपत्रें आतां सुरक्षित रहातील.

**रत्नागिरी जिल्ह्यांत मौल्यवान वाळू**—मुंबई राज्यांतील रत्नागिरी जिल्ह्यांत इलमेनाइट जातीची वाळू मोठ्या प्रमाणांत उपलब्ध झाली आहे. ही वाळू एवढ्या प्रमाणांत फक्त भारतांतच सांपडत असल्यानें तिची मक्तेदारीच भारताकडे आहे असें समजतें. वाळूपासून काढलेल्या टिटॅनियमचा उपयोग शस्त्रास्त्रांच्या निर्मितीसाठीं आणि रंग तयार करण्यासाठीं करतां येतो. रत्नागिरी जिल्ह्यांतील मालगुंद ह्या गांवीं वाळू काढण्याचें काम चालू करण्यांत येणार आहे.

**खेळण्यांचें प्रदर्शन**—येत्या नोव्हेंबर महिन्यांत लखनौ येथें खेळण्यांचें एक आंतरराष्ट्रीय प्रदर्शन भरविण्यांत येणार आहे. अमेरिका, इंडोनेशिआ, अफगाणिस्थान व डेनमार्क ह्या राष्ट्रांनीं आपलीं खेळणीं पाठविण्याचें आश्वासन दिलें आहे. इतरहि बरींच राष्ट्रें प्रदर्शनांत भाग घेणार आहेत. प्रदर्शनांत मातीचीं, धातूंचीं, कागदाचीं व इतर खेळणीं ठेवण्यांत येणार आहेत.

**पादत्राणांच्या जाहिरातीची नवी कल्पना**—बाटा ह्या सुप्रसिद्ध बुटांच्या कंपनीच्या विक्रेत्यांची एक बैठक नुकतीच मुंबईला भरली होती. विक्रीच्या व्यवस्थेंत काय सुधारणा करण्यांत यावी आणि बुटाच्या किंमती सर्वांना परवडतील इतक्या कमी कशा कराव्या ह्यासंबंधीं प्रतिनिधींनीं विचारविनिमय केला. मुंबईमधील ५०० शाळकरी मुलांना कंपनीनें ताजमहाल हॉटेलमध्यें बोलाविलें आणि त्यावेळीं त्यांना ४८० प्रकारचे बूट दाखविण्यांत आले.

**दिल्लींत विक्री कर**—दिल्लीमधील व्यापाऱ्यांकडून ता. १ नोव्हेंबर पासून विक्रीकर घेण्यांत येणार आहे. १ एप्रिल १९५० पासून ३१ मार्च १९५१ पर्यंत ज्या व्यापाऱ्यांची वार्षिक उलाढाल ३०,००० रुपयांच्यावर आहे ते ह्या कराच्या कक्षेंत येतील. त्याशिवाय ज्या व्यापाऱ्यांनीं दिल्लींत विकण्यासाठीं बाहेरून माल आणला असेल अगर तयार केला असेल त्यांनाहि हा कर द्यावा लागणार आहे. त्यांच्या बाबतींत वार्षिक १०,००० रुपयांच्या मालाच्या व्यवहाराची मर्यादा ठेवण्यांत आली आहे.

### ब्रिटनपुढील आर्थिक पेंचप्रसंग

ब्रिटन आणि प. युरोपांतील राष्ट्रें ह्यांनीं रशिया आणि तदंकित देश ह्यांच्याशीं व्यापार फारसा करूं नये अशी अमेरिकेची इच्छा आहे. पण या व्यापारांत छाटाछाट करण्यास ब्रिटन तयार होईल असें दिसत नाहीं. कारण असें केल्यास ब्रिटनला अन्नधान्य, घरें आणि गुरांचें खाद्य ह्या वस्तूंचा तुटवडा पडणार आहे. प. युरोपांतील देशांनीं रशियाला कच्चा माल आणि यंत्रसामुग्री पुरविली तर त्यांचा उपयोग लष्करी कारणासाठीं करण्यांत येण्याचा संभव आहे हें खरें, पण रशियाकडून न मिळणारा माल प. युरोपांतील राष्ट्रांना अतिशय जरूरीचा आहे हेंही तितकेंच खरें आहे. ह्या परिस्थितीसंबंधीं लिहितांना 'इकानॉमिस्ट' ह्या साप्ताहिकानें असे विचार व्यक्त केले आहेत कीं पूर्व युरोपांतील राष्ट्रांचा तेजोभंग करण्याच्या नादांत पश्चिमेकडील राष्ट्रें स्वतःचें नाक कापून घेण्याचा धोका आहे. अमेरिकेला जो माल रशियाला मिळूं नये असें वाटतें, त्यापैकीं ९० टक्के माल पाठविण्याचें ब्रिटननें आधींच बंद केलें आहे. अमेरिकेच्या म्हणण्याप्रमाणें लोकर आणि रबर हा कच्चा माल व यंत्रसामुग्री ह्या वस्तू रशियाला मुळींच पुरवावयाच्या नाहींत असें ब्रिटननें ठरविल्यास पूर्व युरोपांतून कांहींच माल आयात करतां येणार नाहीं. उलट रशियाचें मात्र अडेलच असें नाहीं. जर्मनीनें गेल्या महायुद्धांत कृत्रिम रबर व लोकर वापरली तसें करून रशियाला आपली गरज भागवितां येईल, रशियाकडून ब्रिटनला जो माल मिळतो तो अमेरिका देऊं शकेल. परंतु त्यामुळें ब्रिटनला अधिकच परावलंबी बनावें लागेल. अमेरिकन मदतीबरोबरच्या अनिश्चित आणि अयोग्य अटी स्वीकाराव्या लागतात त्या ब्रिटनला रुचण्यासारख्या नाहींत. शिवाय, दुसरें असें कीं अमेरिकन कॉंग्रेसनें आज जरी मदत देण्याची तयारी दाखविली तरी ती तशींच पुढें चालू राहील ह्याची शाश्वति काय ? अशा परिस्थितींत पूर्व–युरोप व रशिआ ह्यांच्याशीं चाललेला व्यापार-व्यवहार पूर्णपणें थांबविण्याला ब्रिटन नाखूष असल्यास नवल नाहीं.

---

### जपान हिंदी कोळसा घेणार

जपानला बाहेरून आणावा लागत असलेला १० लक्ष टन कोळसा दरसाल भारतांतून आयात करण्याचें जपाननें ठरविलें असून त्याबाबत वाटाघाटी करण्यांत येतील. जपान चीनशीं आपला व्यापार कमी करणार आहे. भारतांतून दरसाल ५ लक्ष टन अशुद्ध लोखंडहि आयात करण्याचा जपानचा विचार आहे.

---

### मुंबई येथें भरणारी इंडियन कोऑपरेटिव्ह कॉंग्रेस

को-ऑपरेटिव्ह रजिस्ट्रार्स कॉन्फरन्स व ऑल इंडिया को-ऑपरेटिव्ह कॉन्फरन्स ह्यांच्या एकत्रीकरणास भारत सरकारनें मान्यता दिली असून ह्यापुढें इंडियन को-ऑपरेटिव्ह युनियनच्या वतीनें एकच परिषद भरविली जाणार आहे. ही परिषद इंडियन को-ऑपरेटिव्ह कॉन्फरन्स ह्या नांवानें मुंबई येथें ३ ते ६ नोव्हेंबर रोजीं भरविण्याचें निश्चित झालें आहे. मुंबई प्रां. सहकारी इन्स्टिट्यूट परिषदेची सर्व तयारी करणार आहे. परिषदेचे ऑनररी सेक्रेटरी श्री. व्हीं. पी. वर्दे हे आहेत. इन्स्टिट्यूटनें एक स्वागत समिति व कार्यकारी समिति नेमली आहे. मुंबई राज्यांतील कोणत्याहि सहकारी कार्यकर्त्यास किंवा सहकारी सोसायटीस किमान २५ रु. वर्गणी देऊन स्वागतसमितीचे सभासद होतां येईल. वर्गणी श्री. व्ही. पी. वर्दे, ऑ. सेक्रेटरी, इं. को. कॉंग्रेस, C/o मुंबई प्रां. सहकारी इन्स्टिट्यूट, ह्या पत्त्यावर पाठवावी.


दि
युनायटेड कमर्शिअल बँक लि.
कलकत्ता.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | ८ कोटी रु. |
| खपलेलें भांडवल | ... | ४ कोटी रु. |
| वसूल भांडवल | ... | १ कोटी रु. |
| रिझर्व्ह फंड | ... | ६० लक्ष रु. |

: बोर्ड ऑफ डायरेक्टर्स :
जी. डी. बिर्ला ( चेअरमन )

| | |
|---|---|
| ईश्वरीप्रसाद गोयंका व्हाइस चेअरमन | रमणलाल जी. सरय्या व्हाइस चेअरमन |
| अनंत चरण लॉ | महादेव एल. डहाणूकर |
| बैजनाथ जालन | मदनमोहन आर. रुइया |
| गोविंदलाल बंगूर | मोहनलाल एल. शहा |
| पी. डी. हिंमतसिंगका | मोतीलाल तापुरिया |
| रामेश्वरलाल नोपानी | नवीनचंद्र मफतलाल |

: जनरल मॅनेजर :
बी. टी. ठाकूर

भारत, ब्रह्मी, पाकिस्तान आणि मलाया येथील महत्त्वाच्या शहरीं व गांवीं बँकेच्या शाखा असल्यानें आणि बँकेच्या सबंध जगभर एजन्सीच्या व्यवस्था असल्यानें भारतांत व भारताबाहेर अत्युत्कृष्ट बँकिंगची सेवा करण्यास बँक सुसज्ज आहे.



बँक ऑफ महाराष्ट्र लि.
लक्ष्मी रोड पुणें २
बँकेच्या शाखा
मुंबई, नाशिक, चाळिसगांव, धुळें, जळगांव, नागपूर, रत्नागिरी, कोपरगांव, हुबळी, सोलापूर कोल्हापूर, व द. हैद्राबाद.
ग. ल. हळबे,
जॅ. मॅनेजर.

बँकेच्या दोन नवीन शाखा उमरावती व सांगली येथें दसऱ्याचे सुमारास चालूं होतील.

# अर्थ

बुधवार, ता. २६ सप्टेंबर, १९५१





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## हिंदी सहकारी चळवळ

### रिझर्व्ह बँकेचा अहवाल

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या ॲग्रिकल्चरल क्रेडिट खात्यानें भारतांतील सहकारी चळवळींबाबत १९४९-५० ची आकडेवार माहिती देणारा अहवाल नुकताच प्रसिद्ध केला आहे. त्यांतील आकड्यांवरून, सहकारी चळवळीचें हिंदी आर्थिक जीवनांतील स्थान अधिकाधिक महत्त्वाचें होत चाललें आहे, हें दिसून येतें. १९४८-४९ मध्यें एकूण १,६३,८७५ सोसायट्या होत्या, व त्यांचें खेळतें भांडवल २२० कोटी रुपये होतें. १९४९-५० मध्यें सोसायट्यांची संख्या १,७३,०९४ झाली व त्यांचें खेळतें भांडवल २३३ कोटी रुपयांवर गेलें. गेल्या महायुद्धापूर्वी सोसायट्यांचें खेळतें भांडवल १०४ कोटी रुपये होतें, आणि पहिल्या महायुद्धापूर्वी तर तें फक्त ५½ कोटी रुपये होतें. दुसऱ्या महायुद्धानें सहकारी चळवळीच्या वाढीस जोरानें चालना दिली आणि वेगवेगळ्या नियंत्रणांचा फायदा सहकारी चळवळीस मिळाला.

हिंदी सहकारी चळवळीमध्यें पतपेढ्यांचें स्थान फार महत्त्वाचें आहे. सर्व प्राथमिक सोसायट्यांपैकीं ७३% सोसायट्या क्रेडिट सोसायट्या आहेत आणि शेतकी सोसायट्यांत त्यांचें प्रमाण ८१% आहे. प्रत्येक कुटुंबांत सरासरीनें पांच जण असतात, ह्या हिशेबानें सुमारें ६ कोटी, २९ लक्ष लोकांना म्हणजे लोकसंख्येच्या १८·२% लोकांना सहकारी चळवळीचा फायदा मिळत आहे असा हिशेब होतो. शेतीच्या मालास तेजी असल्याकारणानें बाहेरील कर्जावरील अवलंबन कमी झालें आहे, असें आढळून येतें. प्राथमिक सोसायट्यांच्या खेळत्या भांडवलापैकीं ४४% भांडवल ठेवींचें होतें आणि स्वतःचें भांडवल ३०% होतें. प्राथमिक सोसायट्यांनीं १९४८-४९ मध्यें ६० कोटी रुपयांचीं कर्जे दिलीं होतीं; १९४९-५० मध्यें त्यांनीं ७०½ कोटी रुपयांचीं कर्जे दिलीं. १९४९-५० मध्यें बँकांनीं व सोसायट्यांनीं घेतलेल्या कर्जापेक्षां जास्त रक्कम फेडली, ही गोष्ट उल्लेखनीय आहे.

सहकारी चळवळीची वाढ भारतांत सगळीकडे एकसारखी झालेली नाहीं, हें अहवालावरून स्पष्ट कळून येतें. भारतांतील सर्व राज्यांपैकीं मद्रास आणि मुंबई ह्या दोन राज्यांतच एकूण सभासदांपैकीं ४०% सभासद आहेत आणि एकूण खेळत्या भांडवलापैकीं ६०% खेळतें भांडवल आहे. हैद्राबाद व म्हैसूर ह्यांत सहकारी चळवळीनें बरी प्रगति केली आहे, परंतु इतर ठिकाणीं मात्र निराशाजनक परिस्थिति आहे, आणि तेथील प्राथमिक सोसायट्यांचे व्याजाचे दर १२½% ते १५% इतके भारी आहेत. स्वस्त दरानें कर्जपुरवठा करणें एवढें मर्यादित ध्येय सहकारी चळवळीचें आहे असें मानलें, तरीसुद्धां तें अत्यंत अल्प प्रमाणांत साध्य झालेलें आहे. सभासदांना स्वावलंबन पटवून देऊन त्यांना काटकसरीची व बचतीची संवय लावणें आणि त्यांच्यामध्यें खऱ्या सहकाराचीं तत्त्वें बिंबविणें ह्या गोष्टी अद्याप प्रत्यक्षांत उतरलेल्या नाहींत. त्या कारणानें, सभासदांच्या संख्येचे आंकडे कांहींहि सांगोत, सहकारी चळवळीचा खरा फायदा हिंदी जनतेस अद्याप मिळालेलाच नाहीं, असें म्हणणें प्राप्त आहे. ज्या सहकारी संघटनेंत ६½ कोटी लोकांची गणति होते, तिचें प्रत्यक्ष फळ डोळ्यांत भरण्याजोगें आढळत नाहीं. म्हणूनच, सहकारी चळवळीच्या खऱ्या प्रगतीच्या अन्य मार्गांकडे अधिक लक्ष देणें अगत्याचें आहे. दिखाऊपणानें स्वतःचीच फसवणूक करून घेतां कामा नये.

## सौंदर्यप्रसाधनांवरील खर्च

राष्ट्राचें उत्पन्न आणि खर्च ह्यांच्यासंबंधींचा वार्षिक अहवाल ब्रिटिश पार्लमेंटला दरवर्षी सादर करण्यांत येतो. ह्या अहवालांतील आकडेवार माहिती ब्रिटनच्या सेंट्रल स्टॅटिस्टिकल ऑफिसतर्फे गोळा करण्यांत येते. समाजाच्या विविध अंगोपांगांसंबंधींची माहिती अहवालांत एकत्र देण्यांत आलेली असते. ग्राहक आपले पैसे कशा रीतीनें खर्च करतात ह्यासंबंधींची माहिती गोळा करण्याचें काम सध्यां चालू करण्यांत आलेलें आहे. सदरहू मालिकेपैकीं सौंदर्यप्रसाधनावरील खर्चाचे आंकडे हल्लीं गोळा करण्यांत येत आहेत. १९४९चा नोव्हेंबर महिना ह्या कामासाठी निवडण्यांत आला. इंग्लंड, स्कॉटलंड आणि वेल्स ह्यांचे ११६ भाग सोयीसाठीं करण्यांत आले आणि १६ वर्षें अगर त्यापेक्षां अधिक वयाच्या २,९१६ माणसांच्या मुलाखती घेण्यांत आल्या.

ह्या सामाजिक पहाणींत पुढीलप्रमाणें गोष्टी आढळून आल्या. सौंदर्यप्रसाधनांवर झालेल्या एकूण खर्चाचा पाऊण हिस्सा स्त्रियांनीं खर्च केला; उरलेला पाव हिस्सा पुरुषांनीं खर्च केला. नोव्हेंबर हा महिना इतर महिन्याप्रमाणें मामुलीच होता असें गृहीत धरलें तर असें आढळून आलें कीं १९४९ सालीं ब्रिटनमध्यें १२ कोटी पौंड सौंदर्यप्रसाधनांच्यासाठीं खर्च करण्यांत आले. केसांची निगा राखण्यासाठीं जो खर्च करण्यांत आला त्यांत वय अगर उत्पन्न ह्यांच्या अनुरोधानें फारसा फरक पडलेला दिसून आला नाहीं. त्यावरून असें अनुमान काढण्यांत आलें आहे कीं ही बाब एक अनिर्वाह्य सामाजिक गरज म्हणून मानली जात असावी. स्त्रिया केशसंवर्धक दुकानांतून कमी वेळां गेल्या पण त्यांनीं पैसे मात्र अधिक खर्च केले. बहुतेक पुरुषांनीं केशकर्तनासाठीं एक ठराविक छोटीशी रक्कम खर्च केलेली आढळून आली. त्यांतल्या ३० ते ३९ वर्षें वय असलेल्या पुरुषांचा ह्या बाबतींतील खर्च सरासरीनें अधिक आढळून आला. २० वर्षांखालील स्त्रियांचा सौंदर्यप्रसाधनावरील सरासरी खर्च सर्वांत जास्त म्हणजे महिन्याला सुमारें ८ शिलिंग इतका झालेला आढळला. त्यापुढील वयाच्या स्त्रियांच्या गटांत तो कमीकमी होत गेलेला दिसला. ६० वर्षें अगर अधिक वयाच्या स्त्रियांचा सरासरी खर्च मासिक १ शिलिंग ९ पेन्स इतका झालेला दिसला.

आठवड्याला पांच पौंड मिळविणाऱ्या स्त्रियांच्या एका छोट्या गटाची चांचणी करण्यांत आली. तेव्हां असें दिसून आलें कीं

त्या मासिक सरासरी १० शिलिंग ९ पेन्स सौंदर्यप्रसाधनांवर खर्च करतात. घरकाम करणाऱ्या स्त्रियांच्या खर्चाची सरासरी ४ शिलिंग ७ पेन्स पडते. ज्या स्त्रियांचें उत्पन्न आठवड्याला ३ पौंडांपेक्षां कमी होतें त्यांची ह्या खर्चाची सरासरी ३ शिलिंग ८ पेन्स एवढी पडते. केशसंवर्धक दुकानांत गेल्यावर पुरुष सरासरी ५ पेन्स 'टिप' देतात. प्रत्यक्ष कामासाठी दिलेल्या पैशाशी 'टिप'चें प्रमाण पाव हिस्सा पडतें. बायका मात्र सरासरी १ शिलिंग अथवा बिलाच्या एक दशांश इतकी 'टिप' देतात असें आढळून आलें. केसांची निगा राखण्यासाठी केलेल्या खर्चाची सरासरी पुरुषांपेक्षां स्त्रियांची अधिक आढळून आली. ज्या मानानें उत्पन्न जास्त त्या मानानें 'टिप' चीही वाढ झालेली दिसून आली. त्याचप्रमाणें जास्त उत्पन्न असणाऱ्या गटांत सौंदर्यप्रसाधनावरील खर्च अधिक प्रमाणांत होत असलेला दिसून आला. त्यांतही चेहऱ्याचा आकर्षकपणा वाढविण्यावर अधिक खर्च होतो. त्या मानानें केसांच्या निगेवर होत नाहीं. ह्याचें कारण असें असावें कीं, एखाद्या व्यक्तीला ज्यावेळीं अधिक पैसे मिळूं लागतात, त्या सुमारास तिचें वय इतकें असतें कीं केसासंबंधीं कांहीं 'प्रसाधन' करण्याचा कांहीं उपयोग होत नसावा. पण चेहऱ्याचा आकर्षकपणा टिकविण्याची ह्याहीं वयांत शक्यता असते. स्त्रियांच्या बाबतींत वरील निष्कर्ष लागू पडण्यासारखा असला तरी पुरुषांच्या बाबतींत वेगळा अनुभव आला. बहुतेक पुरुष केसांना लागणारीं आरोग्यदायक तेलें अगर क्रीम वापरतांना आढळून आले. त्यांच्या ह्या खर्चाची मासिक सरासरी सुमारें ८ पेन्स पडते. ब्रिटनमध्यें सर्वांना सवलतीनें वैद्यकीय सल्ला व मदत मिळतात. परंतु ह्यां मदतीपेक्षां अधिक कांहीं गरजा शिल्लक रहातातच. उदाहरणार्थ, मालिश करून घेणें, अथवा आरोग्यदायक नैसर्गिक झऱ्यांच्या पाण्यानें स्नान करणें. ह्या बाबींवर होणाऱ्या खर्चाची पहाणीहि करण्यांत आली. पायाची दुखणीं पुरुषांपेक्षां स्त्रियांना अधिक झालेली आढळून आली. अर्थात त्यासंबंधींच्या उपचारावर स्त्रियांनीं अधिक खर्च केलेला दिसतो, हें ओघानेंच आलें.

## आर्थिक व्यवहारांत माणुसकीचें मूळ कसें राखलें जाईल ?

(श्री. पु. पां. गोखले, चेअरमन, कराड अर्बन को. बँक लि.)

लोकशाही ही लोकांच्या स्वयंस्फूर्त व शिस्तीला लावलेल्या सहकारानेंच यशस्वी होत असते. एकाद्या संस्थेमध्यें स्वयंस्फूर्त शिस्त निर्माण होत नसेल तर शासनसंस्थेनें ती शिस्तही लावली पाहिजे. पण याचा अर्थ असा नव्हे कीं लोकांनीं काढलेल्या सहकारी संस्थांस शासनसंस्थेनें ऊठवैस "मुकी बिचारी कुणी हांका!" असें समजून वागावें!! स्वयंस्फूर्त सहकार शासनसंस्थेचा संवगडी होईल, पण सेवकाची भूमिका तो कधींच स्वीकारणार नाहीं. राष्ट्रीय उत्पादन वाढविण्यासाठीं, लोकांच्या गरजांप्रमाणें वस्तुमात्रांचें लोकांत वांटप करण्यासाठी आणि सर्व संपत्साधनांचा सदुपयोग सामूहिक सुखसमृद्धीला लावण्यासाठी शासनसंस्था आणि 'सहकारी पतपेढ्या बहिणी-मैत्रिणींप्रमाणें राहिल्या-वागल्या पाहिजेत, म्हणजे सहकारी सर्वोदयी समाजरचनेचा पाया बळकट बसूं लागेल. मुंबई राज्यांत या धोरणाचा पाठपुरावा करतांना शासनसंस्थेच्या पहारेकऱ्यांनीं सहकारी संस्थांना "अंकित पदांबुजांची दासी" बनविण्याला कमी केलें नाहीं असा टाहो मुंबई प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँकेचे अध्यक्ष व सहकार-शंकराचार्य श्री. सरैय्या यांनीं ऑक्सफोर्ड परिषदेपुढें "सहकार व शासनसंस्था" हा प्रबंध मांडून आणि त्यांत रासन-दुकानांची व विशेषतः (कंझ्युमर्स) वापरदार-सहकारी पतपेढ्यांचीं उदाहरणें देऊन फोडला आहे. भारतांत सहकारी सर्वोदयी समाजाची आणि बाहेर "एक जगाची" भाषा सुरू झाल्याकारणानें शासनसंस्थांच्या सासुरवासाला वाचा फोडून त्याचें पुढेंमागें सुलतानशाहींत रूपांतर होऊं नये, म्हणून श्री. सरैय्या यांच्या प्रबंधप्रकटीकरणाला मोठें महत्त्व आहे. सत्ता स्वतःला नेहमींच शहाणी समजते व पुष्कळ वेळां विचारवंतांच्या हातीं तशी असतेही. आर्थिक व्यवहारांतही बंधुभावानें सुजनता सांभाळून एकंदर समाजाच्या जीवनांतील नैतिक मूल्यें, पुष्कळ वेळां चुकणारांना सुधारण्याची संधि देऊनच, विकसविण्याचें कार्य सहकारी संस्थांना करावयाचें असतें. यामुळें माणुसकीचें मूळ राखण्यावर सहकारी संस्था भर देतात, तर शासनसंस्था नियमावलींच्या शब्दांच्या परवलीनें शिस्तीच्या नांवाखालीं बडगा धरीत असते.

आपल्याही बँकेचा अनुभव श्री. सरैय्यांच्या अनुभवापरता दुसरा कांहीं नाहीं. तथापि शासनसंस्थेची काय किंवा सहकारी संस्थेची काय, खरे शेवटीं जनताच मालक असलेकारणानें जनतेसाठी व्यक्तींनीं काय किंवा संस्थांनीं काय, थोडीफार गैरसोय वा मानसिक कुंचंबणा सोसून देखील जनतेची सेवा करावयाची आहे. कां कीं नामदार गोखल्यांनीं म्हटल्याप्रमाणें—

"राष्ट्राची उभारणी करणें हें काम कोठेंही कठीणच आहे. त्यांत हिंदुस्थानांत येणाऱ्या अडचणी तर इतक्या जबरदस्त आहेत कीं त्यांच्यापुढें आपली सर्व शक्ति, आपली सारी भक्ति आणि आपला शांतपणा हीं अगदीं कसोटीला लागतात. आजची स्थिति अशी आहे कीं, आपल्याला यश मिळेल तें थोडें असणार आणि वरचेवर तीव्र निराशा आपल्या पदरीं येणार. पुढें येणारीं माणसें निःसंशय आपल्या यशानें राष्ट्राची सेवा करतील. आम्हांला अपयशानेंच ती सेवा केली पाहिजे. हें जरा कठीण वाटतें; पण या अपयशांतूनच यश मिळण्याला आवश्यक अशी शक्ति आपल्यांत उत्पन्न होईल."

गोपाळ कृष्णांच्या याच आलापावर गुंग होऊन आपण सहकारी बंधुभगिनींनीं खूणगांठ बांधावयाची आहे कीं, राष्ट्रांत नैतिक मूल्यांची जागृति झाली आहे. आर्थिक व्यवहारांत ज्यांचीं नीतिमत्ता सुटत नाहीं, तोच खरा नीतिमान्, हें प्रमेय राष्ट्राला आतां पटलें असून त्या नैतिक जीवनाची भूक राष्ट्राला लागली आहे. तथापि याबाबत कांहीं किमया वा जादूगिरी होईल, अशा भ्रमांत आपण राहतां कामा नये. दीर्घ काळपर्यंत कष्टासायासांनीं केलेल्या प्रयत्नांचें, सर्व तऱ्हांच्या त्यागाचें व सत्प्रवृत्त स्त्री-पुरुषांच्या निर्लोभीपणाचेंच तें फलित ठरणारें आहे. अशा स्थितींत आपल्या हातीं येणारें यश हें वावडी होऊन आकाशांत उडणाऱ्या कागदाच्या चिठोऱ्याप्रमाणें न राहूं देतां, आपण शुद्ध व्यावहारिक राहूं, तर आस्तेकदम आपण आपल्या उत्कट भव्य ध्येयाप्रत खासच पोहोंचूं.

**लोकसंख्येंत रोज ६०,००० ची वाढ**—जागतिक संघटनेतर्फे असा अंदाज करण्यांत आला आहे कीं जगाची लोकसंख्या रोज सुमारें ६०,००० नें वाढत आहे. विसाव्या शतकाला आरंभ झाल्यापासून जगाची लोकसंख्या ८२,६०,००,००० नें वाढली आहे. ह्या वाढीपैकीं निम्मी वाढ आशियांतील देशांतून झाली.

## हिंदमधील चहा व तत्सम धंदे

युनायटेड प्लँटर्स असोसिएशन या संस्थेचें वार्षिक अधिवेशन नुकतेंच कुन्नूर येथें भरलें होतें. त्याचें उद्घाटन सरकारच्या व्यापार मंत्र्यांनीं केलें. या अधिवेशनांत संस्थेचे अध्यक्ष श्री. डी. सी. कोठारी यांनीं असें सांगितलें कीं लागवडीचा किंवा मळेवाल्यांचा धंदा हा हिंदमध्यें सर्वांत जास्त करांचें दडपण सहन करावा लागणारा धंदा आहे; कारण प्राप्ती–कर, कांहीं ठिकाणीं शेतीच्या उत्पन्नाच्या प्राप्तीवरील कर, उत्पादनावर कर, निर्गत कर व विक्री–कर इतक्या प्रकारचे कर या धंद्याला भरावे लागतात. यामुळें उत्पादनाचा खर्च वाढून जागतिक बाजारपेठेला तोंड देणें दिवसें–दिवस कठीण जात आहे. मध्यवर्ती रेव्हिन्यू बोर्डानें शेती कंपन्यांच्या शेअरहोल्डर्सना डिव्हिडंडवरील प्राप्तीकराची सूट मिळणार नाहीं असें धोरण ठरविल्यामुळें अशा प्रकारच्या कंपन्यांच्या शेअर्समध्यें भांडवल गुंतविण्याची प्रवृत्ति कमी होत आहे. मजूर कायद्यामुळें याव्या लागणाऱ्या निरनिराळ्या सवलतीमुळें मजुरीवरील खर्च वाढत आहे, व त्यांतच कांहीं ठिकाणीं बेशिस्त व उत्पादनांत ढिलाई या गोष्टी अनुभवास येत आहेत. कॉफीचें उत्पादन गेल्या वर्षीं फक्त १८ हजार टन झालें. त्यामुळें निर्गत मर्यादित करावी लागली. जागतिक बाजारांत रबराच्या किंमती भरमसाट वाढल्या आहेत, परंतु हिंदमधील रबराच्या किंमती इतक्या कमी आहेत कीं उत्पादन करणेंहि फार कठीण जातें, व त्यामुळें रबराच्या धंद्याची सुधारणा करण्यासाठी नवीन भांडवली खर्च करणें अशक्य झालें आहे. गेल्या वर्षी चहाचें उत्पादन ६० कोटी पौंड झालें; हें उत्पादन १९४६ च्या अखंड हिंदुस्थानांतील उत्पादनापेक्षां जास्त आहे.

चहाच्या धंद्यांतील अडचणींचा उल्लेख करतांना मि. सी. ई. डेनीज् यांनीं सांगितलें कीं, चहाचें उत्पादन वाढलें परंतु गेल्या वर्षी हिंदी चहाची निर्गत त्याच्या पूर्वीच्या वर्षांच्या मानानें कमी झाली. चहाच्या बाबतींत "खरेदी करणारांची बाजारपेठ" निर्माण झाली आहे व चहाचें पॅकिंग व किंमत या बाबतींत तक्रारी ऐकूं येतात. परंतु हिंदी चहाचा दर्जा मात्र सुधारत आहे असें सरकारी प्रतिनिधींच्या माहितीवरून दिसून येतें. नफ्याच्या ४० टक्के भागावर प्राप्ती-कर भरावा लागतो, शेतीवरचा प्राप्ती-कर नफ्याच्या ६० टक्के भागावर भरावा लागतो, उत्पादनावरचा कर दर पौंडाला तीन आणे, निर्गत कर २०० पौंडांवर दोन रुपये, १ आणा टी सेस, व स्थानिक विक्री–कर इतक्या कर–भारामुळें उत्पादन करणें कठीण जात आहे. अकरा वर्षांनंतर लंडन येथें चहाचा लिलांव करण्याची पद्धत पुन्हां सुरू झाली आहे. त्याचे परिणाम काय होतात हें अजून दिसून यावयाचे आहेत. ब्रिटनमध्यें अजून चहाचें रेशनिंग असून दर माणशीं दर आठवड्याला दोन औंस चहा दिला जातो. हें प्रमाण अर्ध्या औंसानें वाढविलें तरी वर्षाला ६ कोटी पौंड जादा चहा खपूं शकेल. १९५१ सालीं २७॥ कोटी पौंड चहा लंडनच्या बाजारांत लिलांवानें विक्रीसाठी पाठवावा असें सरकारनें ठरविलें आहे. चहाची परदेशांत निर्गत २० टक्क्यांनीं वाढवावी असें धोरण सरकारनें ठरविलें आहे, परंतु या बाबतींत केले जाणारे प्रयत्न अपुरे आहेत. चहाच्या किंमतींनीं वाढीचा उच्चांक गांठला आहे, व यापुढें जागतिक उत्पादन वाढण्याचा संभव असल्यामुळें किंमती उतरतील. परंतु हिंदमध्यें उत्पादनाचा खर्च कमी होण्याची कांहींच शक्यता दिसत नाहीं; तर उलट निरनिराळ्या मजूरविषयक कायद्यांमुळें खर्च कदाचित वाढेलहि.

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक, लि. (स्थापना १९१८)
शाखा :
१ दादर
२ माहीम
३ बेळगांव
४ पुणें—सोमवार पेठ, सारस्वत कॉलनी, पुणें.
दरमहा १ रु. पासून ४०० रुपयांपर्यंत हप्त्याची बचत योजना. व्याज ३ ते ३½ टक्के.
हेड ऑफिस– गिरगांव, मुंबई.

निर्गतीला चालना देण्यासाठीं भरपूर प्रमाणांत पॅकिंगसाठी प्लायवुडचे खोके उपलब्ध झाले पाहिजेत. परंतु परदेशांतून आयात करावयाच्या खोक्यांची मर्यादा सरकारनें ठरवून दिली आहे, व देशांत तयार होणारे २० लक्ष खोके धंद्यानें प्रथम खरेदी केले पाहिजेत असें १९५० सालासाठी सरकारनें ठरवून दिलें होतें. परंतु सरकारी अंदाजाप्रमाणें खोक्यांचें अंतर्गत उत्पादन होत नाहीं व त्यांचा दर्जाहि कमी प्रकारचा आहे. तेव्हां पुरेसे प्लायवूडचे खोके न मिळाल्यामुळें निर्गतीची कुचंबणा होते. सेंट्रल टी बोर्डानेंहि या गोष्टीकडे लक्ष द्यावें असें सुचविलें आहे. फॅक्टरी कायदे व मध्य सरकारचे एक्साईज नियम यांमुळें चहाच्या मळेवाल्यांना इतके माहितीचे फॉर्म्स भरावे लागतात कीं ही माहिती भरण्यांतच फार वेळ जातो व त्याचा उत्पादनावर कांहीं ठिकाणीं अनिष्ट परिणाम होतो. तरी या गोष्टीकडे सरकारनें लक्ष द्यावें असें मि. डेनीज यांनीं सुचविलें. चहांत भेसळ केली जाऊं नये, या गोष्टीकडे मध्यवर्ती टी बोर्ड लक्ष देत आहे.

**६७ लाख रुपयांच्या पुस्तकांची आयात**—एप्रिल १९५० ते मार्च १९५१ ह्या काळांत भारतामध्यें २२,८७६ हंड्रेडवेट वजनाचीं पुस्तकें, नकाशे, इत्यादि प्रकारचें छापील साहित्य आयात करण्यांत आलें. ह्या साहित्याची किंमत ६७,५१,८२२ रुपये होती. सर्वांत अधिक पुस्तकें इंग्लंड व अमेरिका ह्या देशांकडून आयात झालीं. भारतांत एकूण सुमारें १५०० पुस्तक–विक्रेते असावेत असा अंदाज करण्यांत आला आहे.

**संशोधक डॉक्टराचा मृत्यु**—माकडाच्या शरीरांतील विशिष्ट ग्रंथी माणसाच्या शरीरांत बसवून मानवी आयुष्य वाढविण्याचे प्रयोग करणारे सुप्रसिद्ध संशोधक डॉ. व्होरोनॉफ हे नुकतेच मरण पावले. त्यांनीं हा प्रयोग स्वतःवरहि करून घेतला होता. माणसावर योग्य ते वैद्यकीय प्रयोग करण्यांत आल्यास तो १५० वर्षे जगूं शकेल असें त्यांचें मत होतें.

**मोटारींच्या अपघातांत वाढ**—भारतांत मोटारींच्या अपघातांची संख्या वाढत असल्याचें आढळून आलें आहे. १९४७–४८ सालीं १३,५७५ अपघात झाले. १९४८–४९ सालीं २१,४७३ अपघात झाले आणि १९४९–५० सालीं २३,६०७ अपघात झाले. मोटारींच्या संख्येंत झालेली वाढ आणि गैरवाकबगार ड्रायव्हर्स, अशीं दोन कारणें वाढीला जबाबदार आहेत.

**लोकरीची निर्यात**—राजस्थानमधून लोकरीच्या निर्यातीस खुली परवानगी द्यावी अशी सूचना त्या सरकारतर्फे मध्यवर्ती सरकारला करण्यांत आल्याचें समजतें. लोकरीच्या व्यापाराच्या भरभराटीच्या दृष्टीनें निर्यातीवर घेण्यांत येणाऱ्या किंमतीवर आकारलेली जकातहि रद्द करण्यांत यावी अशीहि मागणी करण्यांत आली आहे.

**जपानी यंत्रसामुग्रीचा उपयोग**—हैद्राबाद संस्थानमधील ग्रामोद्योगाचा विकास करण्यासाठीं जपानच्या ग्रामोद्योगांत वापरली जाणारी यंत्रसामुग्री वापरण्याचें हैद्राबादच्या सरकारनें ठरविलें आहे.

फोनः १७५११ तारः SAHYOG

## दि प्रॉव्हिन्शिअल इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह असोसिएशन, लि.

९ बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई १.

उत्पादकांच्या ( प्रोड्यूसर्स ) सोसायट्यांना असोसिएशन खालील मालाचा पुरवठा करतेः—

सूत, रसायनें, रंग, कच्चीं कातडीं व चामडीं, कातडीं कमाविण्यास लागणारा माल, कमावलेलें कातडें, इ., मशीन-टूल्स आणि इक्विपमेंट् इ.

आणि

खालील मालाच्या विक्रीस साहाय्य करतेः—

हातमागावरील कापड ( सुती व लोकरी ), धातूचें सामान, चंदनी लाकूड, रोजवुड आणि हस्तिदंती आर्टस् अँड क्रॅफ्टस्; रेशीम, जर, कातडीं व कातडी माल, खाद्य तेलें, लाकूड आणि कोळसा वगैरे.

## भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

मुख्य कचेरीः—भोर, जि. पुणें.

शाखाः—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ७१,६०० |

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. कृ. खोले. — श्री. चं. रा. राठी.
श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलएल्. बी. — श्री. बा. म. चंदुके.

सरकारी रोखे खरेदी–विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते. दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरीः—बुधवार घ. नं. ३६१–६२; पासोड्या विठोबाजवळ. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

रा. गो. आगाशे, बी. ए. ( ऑ. )
मॅनेजर.

## दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.

## ठेवी स्वीकारण्यांत येतात

ठेवींवर दरसाल दर शेंकडा ७॥ रुपये व्याज दिलें जातें. व्याज दर तीन महिन्यांनीं दिलें जातें. ठेवीदारास ठेवीची मुदत संपण्यापूर्वी आपली रक्कम परत पाहिजे असल्यास एक महिन्याच्या आगाऊ नोटिसीनें केव्हांही व्याजासह परत मिळूं शकते.

पेडणेकर आणि कंपनी लिमिटेड

शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी,

१७२, गिरगांव रोड, मुंबई ४

टेलिफोन २२७३८ तारेचा पत्ताः 'PEDNECO' Bombay

## दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि.

( शिड्यूल्ड बँक )

प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग
पुणें २.

| | |
|---|---|
| अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | रु. ७,१९,४८५ |
| खेळतें भांडवल | रु. ७५,००,००० |

मुंबई शाखाः—कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८२, मेडोज स्ट्रीट, मुंबई १

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. द्वा. ग. बापट, उपाध्यक्ष.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

श्री. गो. घों. जोगळेकर, बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल्. बी., मॅनेजर. — श्री. सी. टी. चितळे, मॅनेजिंग डायरेक्टर.

### शेतकरी सहकारी संघ लि., शाहुपुरी–कोल्हापूर

संघानें १२ व्या वर्षी १,७५,२२५ रु. शेअर भांडवल व १३,३५,२५१ रु. खेळतें भांडवल ह्यांच्या सहाय्यानें ३,६९,०६,०६९ रु. चा व्यवहार केला, आणि निव्वळ नफा १,०६,५२६ रु. उरला. संघाची मुख्य कचेरी, १० शाखा व १२ डिपो ह्या ठिकाणीं मिळून सुमारें १३० नोकर काम करीत आहेत, ह्यावरूनहि संघाच्या कार्याचा व्याप लक्षांत येईल. अहवालाचे वर्षी, ऑक्सफर्ड येथील कॉमनवेल्थ ॲग्रिकल्चरल परिषदेस हजर राहून युरोपांतील सहकारी चळवळ व शेती ह्यांची माहिती घेण्यासाठी संघाचे मॅ. डायरेक्टर श्री. ता. गो. मोहिते ह्यांना संघाच्या वतीनें पाठविण्यांत आलें होतें. त्यांच्या अनुभवाचा फायदा संघास व जिल्ह्यांतील सहकारी चळवळीस मिळणार आहे, ही फार समाधानाची गोष्ट आहे, ( प्रेसिडेंट : श्रीमत् स. ल. बेनाडीकर क्षात्रजगद्गुरु महाराज. मॅ. डायरेक्टर : ता. गो. मोहिते. वा. सभा: २५–९–५१ )

### बार्शी सें. को. बँक लि.

वरील बँकेचा व्यवहार गेल्या पांच वर्षांत पुष्कळच वाढला आहे. १९४६–४७ मध्यें एकंदर व्यवहार ५१ लक्ष रु. होता, तो १९५०–५१ मध्यें ९६ लाखांवर गेला. कर्जाऊ दिलेली रकम २६४ हजारांवरून ८९२ हजार रु. वर गेली आणि निव्वळ नफा ३८२ रु. चा १३,७५४ रु. झाला. लांब मुदतीचें कर्ज देण्यासाठी ह्या बँकेस एजन्सी मिळून बँकेमार्फतच ह्या तालुक्यांत कर्जें वाटण्याची व्यवस्था होऊन प्रत्यक्ष कामास लवकरच प्रारंभ होईल. ऐपतवान शेतकऱ्यांना चालू शेतीसाठी लागणारें कर्ज देण्याची योजना सरकारनें ठरविल्याप्रमाणें बँकेनें मान्य करून ४% दरानें कर्जें देण्यास प्रारंभहि केला आहे. बँकेच्या नोकरवर्गांपैकीं प्रत्येक वर्षी एकेक नोकरास महाराष्ट्र सहकारी विद्यालय, पुणें, येथें शिक्षण घेण्यासाठी बँकेतर्फे पाठविण्यांत येतें. अहवालाचे वर्षी बँकेस १३,७५४ रु. नफा झाला. ६¼% डिव्हिडंडला ५,९४२ रु. लागतील. ( चेअरमन : रामचंद्र गोविंद परंडकर. ऑ. मॅनेजर : विश्वनाथ एकनाथ रेडे. वा. सभा : ३०-९-५१ )

### दि महाड को. अर्बन बँक लि.

गेल्या सालाप्रमाणें अहवालाचे वर्षी ठेवी कमी झाल्या नाहींत. हुंडी कर्जव्यवहार वाढत्या प्रमाणावर आहे. एकूण कर्जाचा व्यवहार पाऊण लाखानें वाढला आहे. अहवालाचे वर्षी बँकेचे मॅनेजर श्री. घारप ह्यांना बँकेनें को. ट्रे. कॉलेजमध्यें शिक्षणाकरितां पाठविलें होते. ते पहिल्या वर्गांत पास झाले. अहवालाचे सालाचा निव्वळ नफा १२,६९६ रु. आहे. ५% डिव्हिडंडसाठीं ३,७०१ रु. लागतील. बँकेच्या ८,६६,१७८ रु. खेळत्या भांडवलांत १,२८,१६६ रु. बँकेचें स्वतःच्या मालकीचें भांडवल आहे. ( चेअरमन : दत्तात्रय नरहर वैद्य, बी. ए., एलएल. बी. ऑ. मॅ. डायरेक्टर : पि. गो. मेहता, बी. ए., एलएल. बी. मॅनेजर: मा. गो. घारप, बी. एससी., एच. डी. सी. वा. सभा: ३०–९-५१ )

### मुंबई प्रांतिक सहकारी बँक लि.

खेडा आणि सातारा जिल्ह्यांत मध्यवर्ती सहकारी बँकांची योजना झाल्यामुळें, प्रांतिक बँकेच्या त्या जिल्ह्यांतील ७+२=९ शाखा बंद करण्यांत आल्या. त्यांचा व्यवहार नव्या बँकांकडे वर्ग करण्यांत आला. अहवालाचे वर्षी ११ नव्या शाखा उघडण्यांत आल्या. नऊ शाखा बंद झाल्या, तरी बँकेकडील व्यक्तिशः व सोसायट्यांच्या ठेवी ७·८० कोटी रुपयांच्या राहिल्या. गेल्या वर्षी त्या ७·८९ कोटी रुपयांच्या होत्या. सर्व तऱ्हेच्या ठेवींत मिळून मात्र ६२ लाखांची घट झाली. सहकारी संस्थांना दिलेलीं कर्जें २·८३ कोटी रुपयांवरून ४·३८ कोटी रुपयांवर गेली. सरकारी रोख्यांतील गुंतवणूक ५·१४ कोटी रुपयांवरून ४·६० कोटी रुपयांवर उतरली. बँकेचे 'कॅश रिसोर्सेस' १३२ लाखांवरून ८४ लाखांवर आले, आणि रिझर्व्ह बँकेकडून घेतलेलें कर्ज ३१ लक्ष रु. होतें, तें १३३ लक्ष रु. झालें. अहवालाचे वर्षी बँकेस ५,४७,८६४ रु. नफा झाला. भागदारांना ४% डिव्हिडंड + १% बोनस देण्यासाठी २,४२,१७५ रु. लागतील. बँकेच्या आतां १५ जिल्ह्यांत मिळून ६१ शाखा आहेत आणि तिचा ताळेबंद १०·६६ कोटी रुपयांचा आहे. ( चेअरमन : आर. जी. सरय्या. ऑ. मॅ. डायरेक्टर : व्ही. पी. वर्दे. वार्षिक सभा : २९–९–५१ )

### सातारा जिल्हा को. लँड मॉर्गेज बँक लि.

बँकेनें अहवालाचे सालीं व्यवहाराचे बाबतींत स्वतःच्या पंधरा वर्षांच्या इतिहासांतील उच्चांक गांठला आहे. खालील आंकडे उद्बोधक आहेत:—

| पंचवार्षिक काल | कर्जदार संख्या | वाटलेलें कर्ज (रु.) |
|---|---|---|
| १ लें पंचवार्षिक ३०–६–४० अखेर | २१६ | २,६३,१२५ |
| २ रें पंचवार्षिक ३०–६–४५ अखेर | २४३ | २,२२,१०० |
| ३ रें पंचवार्षिक ३०–६–५० अखेर | १९२ | ३,३८,६७५ |
| ४ थें पंचवार्षिक ३०–६–५१ अखेरचें एक वर्ष | ११३ | २,२०,२५९ |

बँकेच्या अहवालांत कर्जमागणी, देण्यांत आलेल्या कर्जांची मीमांसा, कर्जांचें तालुकवार पृथःकरण, मागणी व वसूल, थकबाकी, थकबाकीचें तालुकवार पृथःकरण, लँड मॉर्गेज बँकांकरितां स्वतंत्र कायद्याची आवश्यकता, इत्यादि बाबतींत तपशीलवार माहिती देण्यांत आली आहे. संस्थेचा 'अ' वर्ग कायम आहे. बँकेचा व्यवहार वाढविण्यास आतां पुष्कळ वाव मिळाला आहे व बँकेचें खेळतें भांडवल वाढत आहे. जमीनतपासणीचें काम ज्यास्त प्रमाणांत होऊन लवकर कर्ज देतां यावें, ह्यासाठी बँक विशेष प्रयत्न व खर्च करीत आहे व वसुलाकडेहि चालकांचें लक्ष आहे. ( चेअरमन : अण्णाप्पा नारायण कल्याणी. मॅनेजर : एम. एस. पुटाणी. वार्षिक सभा : ३०–९–५१ )

### श्री लक्ष्मी को. बँक लि., सोलापूर

वरील बँकेच्या ठेवींमध्यें गतवर्षापेक्षां वाढ झाली आहे. बँकेनें रिकरिंग ठेवींची योजना पूर्वींच संमत केली आहे. बँकेनें दिलेल्या कर्जांत वाढ होऊन त्यांची रकम १,८३,७६८ रु. झाली आहे. ही वाढ सोनें–चांदीचे तारणावरील जादा कर्जांमुळेंच झाली असून त्यामुळें उत्पन्न वाढलें आहे. अहवालाचे मुदतींत थकबाकी ५,००० रु. नीं कमी झाली आहे. बँकेनें कापड दुकान व्यवस्थितपणें व फायदेशीर रीतीनें चालविलेलें आहे. बँकेस मालकीची इमारत असावी, ह्या दृष्टीनें बोर्डाचा प्रयत्न चालू आहे. अहवालाचे वर्षी बँकेस २,९९२ रु. नफा झाला. शेअरला ०–७–० प्रमाणें डिव्हिडंड मिळणार आहे. ( चेअरमन : ई. आर. देशमुख, जमीनदार. मॅनेजर : एन्. डी. डंके. वार्षिक सभा : २२–९–५१ )


'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

## हिंदी कोळशासंबंधीं संशोधन

कोळसा हा मानवाच्या उपयोगी पडणारा एक अति महत्त्वाचा पदार्थ आहे आणि भारताच्या एकंदर खनिज उत्पादनांत त्याचा भाग ६० टक्के इतका आहे. किंबहुना खाण धंद्याचा तोच पाया आहे. देशांत तर त्याचा फार मोठ्या प्रमाणावर उपयोग केला जातोच, पण पाकिस्तान, सीलोन, ब्रह्मदेश, सिंगापूर आणि हाँग-काँग यांसारख्या नजिकच्या प्रदेशांतच नव्हे तर ऑस्ट्रेलिया व कांहीं प्रमाणांत ब्रिटनकडेहि भारतांतून कोळशाची निर्यात होते. गत वर्षी सुमारें १० लक्ष टनांची निर्यात झाली.

भारतांत कोळशाचा पुरेसा सांठा असला तरी नैसर्गिक तेलाचा फारच थोडा सांठा आहे. याखेरीज भारतांतील कोळशाच्या खाणींत आजच्या उद्योगधंद्यांच्या विविध उपयोगासाठी लागणाऱ्या कोळशाच्या प्रती नाहींत. ही फार वर्षे भासणारी उणीव दूर करण्यासाठी भारत सरकारनें १९४५ सालीं बिहारमधील धनबाद येथें एक इंधन संशोधन संस्था स्थापन करण्याचें ठरविलें. इंधनाच्या—घन, द्रव वा वायुरूप—प्रमुख प्रश्नांवर संशोधन करणें आणि भारतांतील कोळशाच्या सांठ्याची प्राकृतिक व रासायनिक दृष्ट्या पाहणी करणें हे दोन हेतू यामागें होते. याखेरीज इंधनाचा काटसरीनें आणि शास्त्रशुद्ध पायावर उपयोग, देशी कच्च्या मालाचा उपयोग होण्यासाठीं नवीं साधनें शोधून काढणें व वाढविणें, कमी दर्जाच्या इंधनाचा दर्जा सुधारणें आणि कोळशापासून नवीन पदार्थ तयार करून त्यांचा औद्योगिक क्षेत्रांत कसा उपयोग होऊं शकेल हें पाहणें, याबाबत सल्ला देणें हेंही या संस्थेपुढील कार्य होतें.

### कोळशाचा प्रमुख उपयोग

औद्योगिक क्षेत्रांत कोळशाचा उपयोग औष्णिक वीज (थर्मल पॉवर) निर्मितीसाठीं प्रामुख्यानें होतो. भारतांतील ५० टक्के वीज याप्रकारें निर्माण केली जाते. हंगामी पावसावरच बऱ्याचशा अवलंबून असणाऱ्या जलविद्युत्योजनांनाहि कधीं कधीं या बाबतींत मागें पडावें लागतें. सामान्य माणसाला जेवण शिजविण्यासाठीं कोळशाचा उपयोग होतो. भारताच्या एकूण उत्पादनापैकीं सहावा हिस्सा याप्रकारें उपयोगिला जातो. परंतु कोळशापासून गॅस काढून त्याचा उपयोग केल्यास अन्न शिजविण्याचें काम अधिक सुलभ रीतीनें होऊं शकेल. कोळशाचा आणखी मोठा उपयोग म्हणजे रेल्वे एंजिनें चालविण्यासाठी भारताच्या ३२० लक्ष टन कोळशाच्या उत्पादनापैकीं तिसरा हिस्सा कोळसा रेल्वेसाठी लागतो.

दगडी कोळशाच्या स्वरूपांत कोळशाचा लोखंडाच्या उत्पादनांत उपयोग होतो. परंतु उच्च प्रतीच्या लोखंडाच्या खाणी सांपडत असल्या तरी त्यांसाठी पुरेशा प्रमाणांत, त्या प्रतीचा कोळसा भारतांत सांपडत नाहीं. १९३६ सालच्या कोल मायनिंग कमिटीनें अशा प्रकारच्या कोळशाचा अंदाज १४२ कोटी टन असावा असा केला होता, पण १९४६ च्या इंडियन कोल फील्डस कमिटीच्या मतें तो सांठा ७० ते ७१ टनांहून अधिक भरणार नाहीं.

लोखंड आणि पोलाद धंदा हा आधुनिक राष्ट्राचा जीवनरस असून इंधन संशोधन संस्था जळाऊ कोळशाच्या कमतरतेमुळें निर्माण झालेला प्रश्न वॉशिंग आणि 'ब्लेन्डिंग' प्रक्रियेच्या पद्धतीनें सोडवीत आहे. 'मेटॅलर्जिकल कोल' च्या उत्पादनासाठी हलक्या व भारी प्रतींच्या कोळशाचें योग्य प्रमाणांत मिश्रण करणें ही क्रिया 'ब्लेन्डिंग' क्रियेंत येते. 'वॉशिंग' प्रक्रियेमुळें कोळशावरील जादा राख निघून त्याचा चांगल्या प्रकारें उपयोग होतो. या दोन्ही क्रिया आतां मोठ्या प्रमाणावर करण्यांत येतात. बिहारमधील एका मोठ्या खाणींत दर ताशीं १५० टनांची कार्यशक्ति असलेले वॉशिंग प्लँट बसविलें असून दर ताशीं ३०० टन कार्यशक्तीचें दुसरें प्लँट पुढील वर्षी चालू होण्याची अपेक्षा आहे. मेटॅलर्जिकल कोलचा आपला सांठा वाढविण्यासाठी 'वॉशिंग' प्रक्रियेचा उपयोग होतो. त्याप्रमाणें कोळशांतून निघणारें लोहमाक्षिक गोळा झाल्यामुळें गंधक मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे हा दुसरा फायदा त्यामुळें होईल.

### द्रव जळण

आपल्या तेलाच्या एकूण गरजेच्या अवघे ७ टक्के तेल देशांत मिळूं शकत असल्यामुळें, कोळशाचें तेलांत रूपांतर करणें ही देशाच्या दृष्टीनें अत्यंत महत्वाची बाब असून, संशोधन संस्थेनें यास आपल्या कार्यक्रमांत महत्त्वाचें स्थान दिलें आहे. असें उत्पादन कृत्रिम रासायनिक धंद्याच्या मदतीनें करतां येणें शक्य असल्याचें जर्मनीनें दाखवून दिलें असून, गेल्या दोन्ही महायुद्धांत आपली तेलविषयक गरज भागविण्यासाठी याच पद्धतीनें त्या देशानें तेल काढलें होतें. भारतांत हलक्या प्रतीचा कोळसा मुबलक असल्यामुळें आपली तेलाबाबतची गरज पुरी करण्यासाठी या धंद्याचा आपण विकास करावयास हवा.

### पाहाणी केंद्रें

भारतांतील कोळशाच्या सांठ्याबद्दल विविध अंदाज व्यक्त करण्यांत आले. जिऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडियाचे माजी डायरेक्टर डॉ. फॉक्स यांनीं अंदाजें ६००० कोटी टन कोळसा असावा असें मत व्यक्त केलें होतें तर भारतीय कोळसाखाणी समितीनें (१९४६) वापरण्या जोगा कोळसा १६५० कोटी लक्ष टनापर्यंत असावा असा अंदाज प्रकट केला होता. आपल्या जवळील कोळशाचा दर्जा आणि सांठा यासंबंधीं विश्वासार्ह अंदाज तयार करून सर्व प्रकारच्या कोळशाचा चांगल्या प्रकारें उपयोग करून घ्यावा या हेतूनें इंधन संशोधन संस्था सध्या भारतांतील कोळशाची प्राकृतिक व रासायनिक पाहणी करीत आहे. या कामासाठी रांची, धनबाद व आसनसोल नजिकचे ठिकाणीं प्रादेशिक पहाणी केंद्रें आधींच उघडण्यांत आलीं असून कोळसाखाणींच्या इतर ठिकाणींहि तीं उघडण्यांत येत आहेत.

भारताच्या अर्थव्यवस्थेवर सर्वसाधारणपणें व कोळसा धंद्यावर विशेषतः महत्त्वपूर्ण परिणाम करणाऱ्या या विषयांच्या व्यतिरिक्त धनबाद येथें कोळशाची घडण कशा प्रकारें होते यासंबंधीं मूलभूत स्वरूपाचें महत्त्वपूर्ण संशोधन चालू आहे.

या धंद्यास आणि सरकारला या विषयांतील तांत्रिक साह्य देणें हेंहि या संस्थेचें एक काम असून, कोळशाचा शास्त्रोक्त पद्धतीनें वापर करण्यासंबंधीच्या विविध प्रश्नांचे बाबतींत या संस्थेकडून वेळोवेळीं साह्य करण्यांत येतें.

---

**निझामजवळील हिऱ्याची किंमत**—निझामाजवळ १५० कॅरेट वजनाचा जेकब नांवाचा एक हिरा आहे. ह्या हिऱ्याची किंमत अमेरिकेंत करण्याचा प्रयत्न झाला असता, ती १५० लाख रुपये झाली असें समजतें. हा हिरा विकण्याचा निझामाचा विचार होता; परंतु चांगली मागणी न आल्यामुळें विकणें शक्य झालें नाहीं अशी वार्ता आहे.

हें पत्र पुणें, पेठ मांगुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.